श्री. गो. वा. बापट यांनी शेक्सपीअरच्या Two Gentlemen of Verona या नाटकावर रंगभूमी मासिकात परीक्षण लिहिलेले आहे.

परीक्षणाच्या सुरुवातीला, रोमिओपेक्षाही अधिक नीच शीलाची एक व्यक्ती शेक्सपीअरने Two Gentlemen of Verona मध्ये घातली आहे असे सांगून ते म्हणतात ‘ङ्गया नाटकाचे मराठीत भाषांतर झाले आहे किंवा नाही हे मला नक्की माहीत नाही. २

या नाटकाची दोन मराठी रूपांतरे या लेखापूर्वी झालेली होती. ‘ कांतिपूरचे दोन गृहस्थ ’ आणि दत्तात्रय अनंत आपटे यांनी १८९८ मध्ये केलेले ‘ कालिंदी ’ हे रूपांतर, ही ती दोन रूपांतरे. ‘ कांतिपूरचे दोन गृहस्थ ’ अप्रकाशित आहे परंतु १८९१ मध्ये शाहूनगरवासी नाटक मंडळीने त्याचा पहिला प्रयोग केला होता ही माहिती श्री. बापट यांना त्याकाळी उपलब्ध झाली नाही असे दिसते. वाचकांच्या सोयीसाठी त्यांनी नाटकाचे संविधानक दिले आहे. त्यांच्या दृष्टीने, या एकाच नाटकात शेक्सपीअरने प्रेमाचे तीन प्रकार दाखविले आहेत हे या नाटकाचे वैशिष्ट्य आहे. व्हॅलेंटाइनचे प्रेम स्थिर आहे. प्रोटिअसचे प्रेम अस्थिर आहे. ड्यूकने जो वर आपल्या मुलीकरता योजला होता, त्याचे प्रेम हे प्रेमाचे ढोंग होते. प्रेमाचे हे तीन प्रकार जवळजवळ आणल्याने आणि संविधानकात त्यांची परस्परांशी गुंतागुंत केल्याने नाटकाला मनोरंजकत्व आले आहे. यापैकी कोणताही एकच प्रकार मनोरंजक झाला नसता. प्रोटिअसच्या अस्थिर मनोवृत्तीचे विश्लेषण श्री. बापट यांनी सूक्ष्मरीतीने केले आहे. प्रोटिअसची व्यक्तिरेखा शेक्सपीअरने मुद्दामच मोठ्या कुळातील रंगविली आहे असे सांगून ते म्हणतात, की मोठे कूळ किंवा श्रीमंती यावर प्रेमाची स्थिरता अवलंबून नसते. प्रेमाच्या साखरपेरणीवरही नसते. असल्या शीलाचा मनुष्य व असले अस्थिर प्रेम नाटकात दाखविण्यास काही हरकत नाही. जर जगात असली नीच माणसे असतात तर त्यांना नाटकातून का वगळावेङ्ग? मनुष्यस्वभावाचे अगणित प्रकार आणि रूपे असतात. ती सर्वच आपापल्या परीने मनोरंजक असतात. असले पात्र नाटकात वाटेल त्या तऱ्हेने मात्र घालता येत नाही. त्याची योग्य योजना करण्यात कवीचे चातुर्य असते.

श्री. बापट यांनी केलेल्या या विवेचनात त्यांचा नाट्यविषयक पुरोगामी दृष्टिकोन दिसून येतो. नाटकाचा नायक हा उदात्त आणि उच्च कुलीनच असावा असे श्री. बापट यांचे मत

आहे. पण नाटकातून सत्य-शिव सुंदराचेच दर्शन घडावे या पारंपारिक विचारातून मुक्त होऊन वास्तवाच्या जवळ जाणारी दृष्टी येथे दिसते. जीवनविषयक व्यापक जाणिवा नाटकाच्या माध्यमातून स्वीकारण्याची तयारी दिसते. पाश्चात्यांच्या नाट्यदृष्टीतील मर्म जाणलेले दिसते. ते त्यांनी डोळसपणे स्वीकारलेले आहे. सत् आणि असत्, सुंदर आणि कुरूप, सुष्ट आणि दुष्ट अशा अनेक द्वंद्वांनी भरलेल्या मानवी जीवनाचे संपूर्ण, ते जसे आहे तसे चित्रण नाटकात यावे हा विचार त्याकाळात फार महत्त्वाचा होता. पाश्चात्य शिक्षणामुळे बदललेल्या जीवनदृष्टीचा आणि वाङ्मयदृष्टीचा तो परिपाक होता. श्री. बापट यांनी व्यक्त केलेल्या विचारातील आणखी महत्त्वाचा भाग म्हणजे व्यक्तिमनांची किंवा घटना-प्रसंगांची काळी चित्रणे नाटकात कशी आणि का यावीत याबद्दलची त्यांची सूक्ष्म समज हा आहे. दुष्ट, ढोंगी, क्रूर माणसांची चित्रणे नाटकात वाटेल त्या पद्धतीने घालून चालणार नाहीत. या व्यक्तिरेखा अनुकरणीय वाटून चालणार नाही उलट त्यांच्या काळ्या पार्श्वभूमीवर सज्जनांचा सज्जनपणा उठून दिसला पाहिजे. सत्प्रवृत्तीची आवड निर्माण झाली पाहिजे. याचाच अर्थ नाटकाचे उद्दिष्ट, हेतू, परिणाम यांचे अचूक भान श्री. बापट यांना आहे. ‘ योग्य योजना ’ आणि ‘ कवीचे चातुर्य ’ यातून त्यांना हाच अर्थ अभिप्रेत आहे.